# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

**(स्वायत्त)** (ISO:9001:2008)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,

४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. २६४७१२५५ (का.)/२६४७ ०५१६(वै.) फॅक्स - ०२२-२६४७७२१७

email : director@msbte.com Web : www.msbte.com


**परिपत्रक**

जा.क्र.मरातंशिमं/का-१०/५०/ST-SLSC/२०११/७०

दिनांक : २३/०३/२०११

**विषय** : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या, तथापि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील अल्पमुदतीच्या शासनमान्य अ यासक्रमांसाठी कार्यरत संस्थांना मुदतवाढीबाबत..

**संदर्भ** : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. टिईडी २०११/(५४/११)/तांशि-५ दि. १८/३/२०११

उपरोक्त विषयासंदर्भात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या तथापी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील अल्पमुदतीचे शासनमान्य अ यासक्रम चालवित असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शासनाच्या वरील संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत शासनमान्य अल्प मुदतीच्या अ यासक्रम चालविणा-या संस्थांची दरवर्षी तपासणी करुन सदर संस्थांनी राबविलेल्या अ यासक्रमांचे मुल्यांकन, प्रमाणकीकरण, तसेच सदर संस्थांचे शैक्षणिक अहवाल मंडळाकडून तयार केले जात असल्यामुळे अश्या संस्थाकडून मुदत वाढीसाठी अर्ज मागविण्याची आवश्यकता नसल्याचे सदर पत्रात नमूद केलेले आहे.

त्याअनुषंगाने, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील अल्प मुदतीचे शासनमान्य अ यासक्रम चालविणा-या संस्थांना मुदत वाढ देणेबाबत करावयाच्या अर्जा संदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१. या कार्यालयाने निर्गमित केलेल्या दि. ११.२.२०११ च्या अधिसूचनेनुसार सद्यस्थितीत अल्प मुदतीचे शासनमान्य अ यासक्रम चालविणा-या व मंडळाशी संलग्नीत असलेल्या संस्थांनी मुदत वाढीसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
२. सदर संस्थांची तपासणी दरवर्षी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून करण्यात येत असलेल्या शैक्षणिक अवेक्षणातुन करण्यात येईल.
३. सदर संस्थांची शैक्षणिक अवेक्षणानुसार तपासणी केल्यानंतर ज्या त्रुटी आढळतील त्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संबंधित संस्थांना लेखी कळविण्यात येईल.
४. सदर संस्थांनी त्रुटींची पूर्तता विहित मुदतीत न केल्यास सदर संस्थांना संलग्नता काढून टाकणेबाबत मंडळाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
५. ज्या संस्थांनी मंडळाच्या जाहिरातीस अनुसरुन मुदतवाढ घेण्यासाठी यापूर्वीच प्रस्ताव सादर केले असतील अश्या संस्थांना प्रक्रिया शुल्क मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडून परत करण्यात येईल.

तरी सर्व संबंधित संस्थांनी वरीलप्रमाणे सुचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

( जी. बी. धनोकार )
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रतः

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई याना माहितीसाठी सादर.
२. खाजगी सचिव, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग विभाग, मंत्रालय, मुंबई याना माहितीसाठी सादर.
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरिता सादर.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी.
५. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे, औरंगाबाद, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
६. पोर्टल मॅनेजर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी.